Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा!

(पान २ वर)



। गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ । वर्ष १ । अंक १८४ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

'ब्लू ड्रम मर्डर' प्रकरणी मुस्कान आणि साहिलला फाशी

मेरठ । देशभरात गाजलेल्या उत्तर प्रदेशमधील मेरठ येथील सौरभ राजपूत हत्या प्रकरणात जिल्हा न्यायालयाने आज बुधवारी सौरभची पत्नी मुस्कान आणि तिचा प्रियकर साहिल शुक्ला यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. वकील कृष्ण कुमार दुबे म्हणाले की, मेरठ येथील सौरभ राजपूत हत्या प्रकरणात आरोपी मुस्कान आणि साहिल या दोघांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. त्यांना कलम ३०२ अन्वये ५०,००० रुपये आणि कलम २३८-ए अन्वये २०,००० रुपये दंड भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हा एक ऐतिहासिक निकाल आहे. संपूर्ण देशाचे याकडे लक्ष होते; या गुन्ह्यातील दोषींना काय शिक्षा मिळते, याकडे जनतेचे डोळे लागले होते. वकील कृष्ण कुमार दुबे म्हणाले की, आरोपींच्या बाजूने काही युक्तिवाद केले गेले होते. यामध्ये खुनाचा प्रत्यक्षदर्शी कोणीही नव्हता.

जन सम्राट टाईम्स

छत्रपती संभाजीनगर | संभाजीनर येथे छत्तावर कचऱ्याचे डीग, जमिनीवर तेलाचा सडा, कीटक उंदरांना रोखण्यासाठी पुरेशी व्यवस्था नाही आणि कामगारांच्या सुरक्षेकडेही दुर्लक्ष अशी परिस्थिती जुना मोंढा परिसरातील बजरंग ट्रेंडिंग कंपनीच्या ऑईल रिपेकिंग युनिटमधील तपासणीत अन्न सुरक्षेच्या नियमांचे गंभीर उल्लंघन आढळले.

FDA ने छत्रपती संभाजीनगरमध्ये ₹ 23.35 लाख किमतीचे खाद्यतेल जप्त

बजरंग ट्रेडिंग कंपनीचा परवाना निलंबित!

आवश्यक कागदपत्रांबाबत अनेक त्रुटी आढळल्याचे नमूद ; सोयाबीन, पामोलीन तेलाचा साठा जप्त

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) १२ ऑक्टोबर रोजी छापा टाकून तब्बल २३ = लाख ३५ हजार ६५४ रुपयांचे १२ हजार ३८२ किलो खाद्यतेल जप्त केले, तपासणीत २०६ पैकी केवळ १० गुष्ण मिळाल्याने या आस्थापनेला 'नॉन-कॉम्प्लायन्स' घोषित करण्यात आले.अन्न परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला आहे. सेफ फूड, सेफ महाराष्ट्र मोहिमेंतर्गत जाफर गेट, जुना मोंढा येथील मेसर्स बजरंग ट्रेडिंग कंपनीच्या युनिटची तपासणी करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी कीर्तिका एल, झाडे यांनी सहकाऱ्यांसह ही कारवाई केली. तपासणीत स्वच्छता, खाद्यतेलाची साठवणूक, कामगारांची सुरक्षितता आणि आवश्यक कागदपत्रांबाबत अनेक त्रुटी आढळल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.कारवाईत रिफाइंड सोयाबीन आणि पामोलीन तेलाचा एकूण १२ हजार ३८२ किलो साठा जप्त करण्यात आला.



यामध्ये 'केशर गोल्ड' ब्रेडच्या डबे-कॅनमधील ४०७.९ किलो सोयाबीन तेलाची किंमत ८५ हजार ९७० रुपये, टैंक क्रमांक सहामधील ७,९८८.४ किलो सुट्या सोयाबीन तेलाची किंमत १४ लाख ८५ हजार ८४२ १८४२ रुपये, तर टैंक क्रमांक दोनमधील २,९८८.४ किलो तेलाची किंमत ५ लाख ५५ हजार ८४२ रुपये आहे. याशिवाय ७९ किलो पामोलीन तेलाची किंमत १७ हजार ६०० रुपये आहे. हा संपूर्ण साठा संशयास्पद, अपमिश्रित आणि चुकीचे बंडिंग केलेला असल्याच्या कारणावरून जप्त करण्यात आल्याचे प्रशासनाने माटले आहे. तपासणीदरम्यान इमारतीच्या छतावर कचऱ्याचे ढीग, अस्वच्छ स्वच्छतागृह, तेलगळतीमुळे घसरडी झालेली फरशी आणि अन्नपदार्थ व पॅकेजिंग साहित्याची अयोग्य साठवणूक आढळली, खिडक्यांना कीटकप्रतिबंधक जाळ्या नव्हत्या, तर उंदरांना पकडण्यासाठी ट्रॅप्सही बसवलेले नव्हते. कामगारांची वैद्यकीय तपासणी झाल्याची नोंद नव्हती. सुरक्षा साधने नसल्याचे तपासणीत नमूद करण्यात आले.अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) १२ ऑक्टोबर रोजी छापा टाकून तब्बल २३ = लाख ३५ हजार ६५४ रुपयांचे १२ हजार ३८२ किलो खाद्यतेल जप्त केले, तपासणीत २०६ पैकी केवळ १० गुष्ण मिळाल्याने या आस्थापनेला 'नॉन-कॉम्प्लायन्स' घोषित करण्यात आले.

अस्वच्छता अन् सुरक्षेकडे केले दुर्लक्ष

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) १२ ऑक्टोबर रोजी छापा टाकून तब्बल २३ = लाख ३५ हजार ६५४ रुपयांचे १२ हजार ३८२ किलो खाद्यतेल जप्त केले, तपासणीत २०६ पैकी केवळ १० गुष्ण मिळाल्याने या आस्थापनेला 'नॉन-कॉम्प्लायन्स' घोषित करण्यात आले.अन्न परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला आहे. सेफ फूड, सेफ महाराष्ट्र मोहिमेंतर्गत जाफर गेट, जुना मोंढा येथील मेसर्स बजरंग ट्रेडिंग कंपनीच्या युनिटची तपासणी करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी कीर्तिका एल, झाडे यांनी सहकाऱ्यांसह ही कारवाई केली.

'कोणी नागरिक आहे की नाही ठरवण्याचा अधिकार EC। ला नाही' : सुप्रीम कोर्ट

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: मुख्य निवडणूक आयुक्त आणि मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणावरून (Special Intensive Revision SIR) सुरू असलेल्या तीव्र राजकीय घमासानादरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभय एस. ओका (Justice Abhay S Oka) यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. भारताचा नागरिक कोण आहे आणि कोण नाही, हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे (Election Commission of India) अजिबात नाही, असे अत्यंत महत्त्वाचे वक्तव्य माजी न्यायमूर्तींनी केले आहे. लीगल न्यूज पोर्टल 'लाइव्ह लॉ'च्या (Live Law) अहवालानुसार, सर्वोच्च न्यायालयाने मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाला (SIR) घटनात्मकता वैध ठरवणाऱ्या आपल्या आधीच्या आदेशाचा पुन्हा पुनर्विचार केला पाहिजे, असेही माजी न्यायमूर्ती ओका यांनी स्पष्टपणे म्हटले आहे.माजी न्यायमूर्ती अभय ओका यांचे हे वक्तव्य अशा वेळी आले आहे, जेव्हा इंडिया (INDIA) आघाडी आणि कॉंकरोच जनता पार्टीने (CJP) विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेविरोधात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात जोरदार मोर्चा उघडला आहे. देशभरात सुरू असलेली SIR प्रक्रिया तात्काळ रद्द करण्यात यावी आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी आक्रमक मागणी विरोधी पक्षांकडून केली जात आहे. या संपूर्ण प्रकरणात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी (Rahul Gandhi) यांच्यासह विरोधी पक्षातील इतर 12 प्रमुख नेत्यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. याशिवाय



एमआयएमचे (AIMIM) प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनीही सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. ओवैसींचे वकील निजाम पाशा यांनी सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्या बागची यांच्या खंडपीठाकडे आपली याचिकाही गुरुवारी सुनावणीस येणाऱ्या इतर मुख्य याचिकांसोबत सूचीबद्ध करण्याची विनंती केली आहे. निवडणूक आयोगाच्या या एकतर्फी निर्णयाविरोधात दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिकांवर गुरुवारी (15 ऑक्टोबर) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होण्याची दाट शक्यता आहे. सुप्रीम कोर्टाच्या अधिकृत संकेतस्थळावरील अपडेटनुसार, 12 ऑक्टोबर रोजी दाखल आणि 13 ऑक्टोबर रोजी रजिस्टर झालेल्या या याचिकेची संभाव्य सुनावणीची तारीख 15 ऑक्टोबर दाखवली जात आहे. या याचिकेत निवडणूक आयोगाने राबवलेल्या 'स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन' (SIR) च्या पद्धतीला, मतदारयादीतून नावे वगळण्याच्या प्रक्रियेला आणि निवडणूक आयोगाच्या अंतर्गत निर्णय घेण्याच्या पद्धतीला थेट आव्हान देण्यात आले आहे. निवडणूक आयोगाच्या या एकतर्फी निर्णयाविरोधात दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिकांवर गुरुवारी (15 ऑक्टोबर) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होण्याची दाट शक्यता आहे. सुप्रीम कोर्टाच्या अधिकृत संकेतस्थळावरील अपडेटनुसार, 12 ऑक्टोबर रोजी दाखल आणि 13 ऑक्टोबर रोजी रजिस्टर झालेल्या या याचिकेची संभाव्य सुनावणीची तारीख 15 ऑक्टोबर दाखवली जात आहे. या याचिकेत निवडणूक आयोगाने राबवलेल्या 'स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन' (SIR) च्या पद्धतीला, मतदारयादीतून नावे वगळण्याच्या प्रक्रियेला आणि निवडणूक आयोगाच्या अंतर्गत निर्णय घेण्याच्या पद्धतीला थेट आव्हान देण्यात आले आहे.मुख्य निवडणूक आयुक्त आणि मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणावरून (Special Intensive Revision SIR) सुरू असलेल्या तीव्र राजकीय घमासानादरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभय एस. ओका (Justice Abhay S Oka) यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. भारताचा नागरिक कोण आहे आणि कोण नाही, हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे अजिबात नाही, असे अत्यंत महत्त्वाचे वक्तव्य माजी न्यायमूर्तींनी केले आहे.

रेकॉर्ड्स गायब कसे : तुमच्याकडे रेकॉर्ड असायलाच हवा : सुप्रीम कोर्ट

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली । प्रतिनिधी: कर्नाटकच्या सिंघेरी विधानसभा मतदारसंघातील मतमोजणीच्या व्हिडिओ रेकॉर्डिंगवरून सुप्रीम कोर्टाने केंद्रीय निवडणूक आयोगाची खरडपट्टी काढली. २०२३ मधील मतमोजणीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग सापडत नसल्याचा दावा केल्यावर सुप्रीम कोर्टाने कडक शब्दांत निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले. तुम्ही अशा सबबी सांगू शकत नाही, अशा शब्दांत फटकारत कोर्टाने आयोगाला पुढच्या सुनावणीपर्यंत सर्व कागदपत्रे व व्हिडिओ सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती संजीव सचदेवा यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. निवडणूक आयोगाचे वकील शेषाद्री नायडू यांनी कोर्टात सांगितले की, आयोग २०२३ मधील मतमोजणीचा व्हिडिओ शोधण्याचा प्रयत्न करत आहे पण तो सापडत नाहीये. तेव्हा खंडपीठाने यावर आश्चर्य व्यक्त केले. "निवडणूक आयोग रेकॉर्ड गहाळ झाले आहे असे कसे काय म्हणू शकतो? तुमचे मूळ कामच निष्पक्ष निवडणुका घेणे आहे, त्यामुळे तुमच्याकडे प्रत्येक अधिकृत रेकॉर्ड असायलाच हवा. यात आम्ही शोधतोय असे सांगण्याचा प्रश्नच येतो कुठून? तुम्ही विजयी उमेदवाराला ते देऊन टाकले का? रेकॉर्ड्सच्या सुरक्षेचे काय? तुमच्याकडे जे काही आहे, ते पुढील सुनावणीच्या



वेळी कोर्टासमोर आणा अन्यथा, आम्हाला तुमच्याविरोधात कठोर निर्णय घ्यावा लागेल. आम्ही अशा सबबी अजिबात खपवून घेणार नाही," असं सुप्रीम कोर्टाने म्हटलं. कर्नाटक विधानसभा निवडणूक २०२३ मध्ये काँग्रेसचे नेते टी. डी. राजेगौडा यांनी भाजप उमेदवार डी. एन. जीवराज यांचा अवघ्या २०१ मतांच्या फरकाने पराभव केला होता. भाजपच्या जीवराज यांनी या निकालाला कर्नाटक हायकोर्टात आव्हान दिले. हायकोर्टाने ६ एप्रिल रोजी टपाल मतांची पुन्हा मोजणी करण्यास आणि नाकारण्यात आलेल्या २७९ टपाल मतांची पुनर्तपासणी करण्याचे आदेश दिले. ३ मे २०२६ रोजी निवडणूक अधिकाऱ्याने पुन्हा निकाल दिला. यामध्ये राजेगौडा यांची तब्बल २५५ मते कमी झाली आणि भाजपचे डी. एन. जीवराज यांना विजयी घोषित करण्यात आले. आमदारकी गेल्याने राजेगौडा यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली.

कर्नाटकच्या सिंघेरी विधानसभा मतदारसंघातील मतमोजणीच्या व्हिडिओ रेकॉर्डिंगवरून सुप्रीम कोर्टाने केंद्रीय निवडणूक आयोगाची खरडपट्टी काढली. २०२३ मधील मतमोजणीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग सापडत नसल्याचा दावा केल्यावर सुप्रीम कोर्टाने कडक शब्दांत निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले. तुम्ही अशा सबबी सांगू शकत नाही, अशा शब्दांत फटकारत कोर्टाने आयोगाला पुढच्या सुनावणीपर्यंत सर्व कागदपत्रे व व्हिडिओ सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती संजीव सचदेवा यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू होती.

कटियारांकडे एमपीएससी सचिवपदाचा कार्यभार

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध मागण्यांसाठी पुण्यामध्ये विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या तीव्र आंदोलनावर मार्ग काढत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पेपरफुटी प्रकरणात अध्यक्ष विवेक भीमनवार यांना तूर्त रजेवर पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर भीमनवार यांनी चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर जाण्याचा निर्णय जाहीर केला. यानंतर आता राज्य लोकसेवा आयोगाच्या सचिवदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे देण्यात आला आहे. महेंद्र हरपाळकर यांच्या बदलीनंतर कटियार यांच्याकडे सचिवपदाची अतिरिक्त जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

निवडणूक आयुक्तांना माहिती न देता एकतर्फी निर्णय घेतले

जन सम्राट टाईम्स



नवी दिल्ली | प्रतिनिधी: मुख्य निवडणूक आयुक्त आणि विशेष मतदारयादी पुनर्परीक्षण विरोधात सुप्रीम कोर्टात राहुल गांधी आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांनी दाखल केलेली याचिका आता औपचारिकपणे दाखल झाली आहे. रजिस्ट्रीने नमूद केलेल्या तांत्रिक चुका सुधारल्यानंतर या याचिकेला रिट याचिका क्रमांक देण्यात आला आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयाच्या संगणक प्रणालीत या याचिकेची संभाव्य सुनावणीची तारीख २६ ऑक्टोबर दिसत आहे. दसऱ्याच्या सुट्ट्यांनंतर २६ ऑक्टोबर रोजी सुप्रीम कोर्टाचे कामकाज नियमितपणे पुन्हा सुरू होणार आहे.

तथापि, न्यायालय शुक्रवार १६ ऑक्टोबरपर्यंत सुरू असल्याने याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी विशेष प्रयत्न केल्यास चालू आठवड्यातही यावर सुनावणी होऊ शकते. कोर्टाच्या नोंदीनुसार, या याचिकेत आता आणखी दोन नेते व्हीसीकेचे संस्थापक टी. थिरुमावलवन आणि नॅशनल कॉन्फरन्सचे नेते सज्जाद अहमद किचलू यांच्या नावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आता याचिकाकर्त्यांची एकूण संख्या १३ झाली आहे. याआधी राहुल गांधी यांच्यासह १० विरोधी नेते याचिकाकर्ते होते. यापूर्वी १२ ऑक्टोबर रोजी जेव्हा ही याचिका दाखल करण्यात आली होती, तेव्हा रजिस्ट्रीने १४ प्रकारच्या त्रुटी काढल्या होत्या.

यामध्ये काही ठिकाणी प्रतिवादींच्या नावांतील चुका, खडकेंच्या ओळखपत्राची अस्पष्ट प्रत, २२० रुपयांचे कमी जमा केलेली कोर्ट फी आणि इतर त्रुटींचा समावेश होता. या सर्व दुरुस्त्या १३ ऑक्टोबर रोजी पूर्ण करण्यात आल्या आहेत. विरोधी पक्षांच्या या याचिकेत देशभरात मतदार याद्यांच्या विशेष मतदारयादी पुनर्परीक्षणाची (एसआयआर) अंमलबजावणी करण्याच्या पद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्तांनी इतर निवडणूक आयुक्तांना माहिती न देता किंवा त्यांची संमती न घेता एकतर्फी निर्णय घेतले.

असा थेट आरोप याचिकेत करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांनी देशभरात एसआयआर सुरू करण्याच्या निर्णयाशी संबंधित सर्व फाइल्स, नोटिंग्स आणि रेकॉर्ड सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. तसेच या याचिकेवर अंतिम निर्णय येईपर्यंत संपूर्ण देशात सुरू असलेले डखठ चे काम तातडीने स्थगित ठेवण्यात यावे, अशी मुख्य मागणी कोर्टाकडे करण्यात आली आहे. याद्यांच्या या विशेष मतदारयादी पुनर्परीक्षण (एसआयआर) प्रक्रियेला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ओवैसींच्या वकिलांना या प्रकरणाशी संबंधित आधीपासून प्रलंबित असलेल्या इतर सर्व याचिकांची यादी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

मुख्य निवडणूक आयुक्त आणि विशेष मतदारयादी पुनर्परीक्षण विरोधात सुप्रीम कोर्टात राहुल गांधी आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांनी दाखल केलेली याचिका आता औपचारिकपणे दाखल झाली आहे. रजिस्ट्रीने नमूद केलेल्या तांत्रिक चुका सुधारल्यानंतर या याचिकेला रिट याचिका क्रमांक देण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

भाजपमध्ये मोठी खळबळ! रवींद्र चव्हाण यांची मोठी ऍक्शन!

१०० नगरसेवकांना पाठवली 'कारणे दाखवा' नोटीस; खुलाशानंतर वरिष्ठ पातळीवर निर्णय

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी: राज्याच्या राजकारणात सध्या बरीच धामधूम सुरु असल्याचे पहायला मिळत आहे. आधीच विरोधकांकडून तसेच विद्यार्थी आणि जेन झी कडून विविध विषयांवरून आंदोलने, निदर्शने होत आहेत. तसेच आगामी विधानपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये अंतर्गत कलहदेखील पाहायला मिळत आहे. अश्यातच भाजपच्या गोटातून मोठी बातमी समोर येत असून पुण्यातील भाजपच्या 100 नगरसेवकांना पक्षाकडूनच नोटीशी धाडण्यात आल्या आहेत.भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या कार्यक्रमाला गैरहजर राहणे पुण्यातील भाजप नगरसेवकांना चांगलेच महागात पडण्याची शक्यता आहे. पुणे विभागातील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या भाजप उमेदवारांच्या प्रचार शुभारंभ कार्यक्रमाला अनुपस्थित राहिलेल्या सुमारे १०० नगरसेवकांना पक्षाकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या नगरसेवकांना पाच दिवसांत आपला खुलासा सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.मागील आठवड्यात पुण्यात भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते पुणे विभागातील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे



यांच्यासह पक्षातील आमदार आणि पदाधिकारी उपस्थित होते.पुणे भाजपसाठी अतिशय महत्वाच्या मानल्या गेलेल्या या कार्यक्रमासाठी पक्षाच्या सर्व नगरसेवकांना उपस्थित राहण्याचे निरोप देण्यात आले होते. मात्र, शंभरपेक्षा अधिक नगरसेवकांनी कार्यक्रमाला हजेरी लावली नसल्याचे समोर आले. काही नगरसेवक कार्यक्रमाला आले, पण काही वेळातच निघून गेले, अशीही माहिती आहे.या कार्यक्रमाला अपेक्षेप्रमाणे उपस्थिती नसल्याचे लक्षात आल्यानंतर सभागृहनेते गणेश बिडकर यांनी उपस्थित नगरसेवकांची नावे नोंदवण्याची सूचना केली. त्यांनी स्वतः सभागृहात फिरून कोणते नगरसेवक उपस्थित आहेत, याची खातरजमा केल्याचे सांगितले जाते. यानंतर अनुपस्थित नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली. पक्षाच्या महत्त्वाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणे आणि पक्षशिस्त पाळणे अपेक्षित असल्याने या गैरहजेरीबाबत स्पष्टीकरण मागवण्यात आले आहे.पुणे महापालिकेत भाजपचे ११९ नगरसेवक निवडून आले असून, सात स्वीकृत सदस्यांसह पक्षाचे एकूण संख्याबळ १२६ असल्याचे दिलेल्या माहितीत नमूद करण्यात आले आहे.

पाच दिवसांत खुलासा द्यावा लागणार

त्यापैकी सुमारे १०० नगरसेवकांना नोटीस बजावण्यात आल्याने स्थानिक राजकीय वर्तुळात या विषयाची चर्चा सुरू झाली आहे. संबंधित नगरसेवकांना पाच दिवसांत उत्तर द्यायचे आहे. त्यानंतर खुलाशांचा अहवाल वरिष्ठ पातळीवर सादर केला जाणार असून, पुढील कारवाईबाबत निर्णय घेतला जाईल. आता संबंधित नगरसेवक आपल्या गैरहजेरीबाबत काय स्पष्टीकरण देतात आणि पक्षाकडून पुढे काय भूमिका घेतली जाते, याकडे लक्ष लागले आहे.राज्याच्या राजकारणात सध्या बरीच धामधूम सुरु असल्याचे पहायला मिळत आहे. आधीच विरोधकांकडून तसेच विद्यार्थी आणि जेन झी कडून विविध विषयांवरून आंदोलने, निदर्शने होत आहेत. तसेच आगामी विधानपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये अंतर्गत कलह देखील पाहायला मिळत आहे.

संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा!

सरसकट शैक्षणिक शुल्कमाफी लागू, टँकरचा 'जीपीएस'द्वारे मागोवा

जन सम्राट टाईम्स

मुंबई -। प्रतिनिधी : दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या हातात दिवाळीपूर्वी पैसे मिळावेत, यासाठी राज्य सरकार प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यात पाच हजार रुपये अग्रीम मदत म्हणून जमा करणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज बुधवारी हा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. केंद्र सरकारकडून दुष्काळी मदत मिळवण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया दिवाळीपूर्वी पूर्ण होणे कठीण असल्याने राज्य सरकारने हा पर्यायी निर्णय घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. याशिवाय राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या २६५ वरून ३०५ करण्यात आली असून, दुष्काळ निवारणासाठीच्या १२ सवलती लागू करण्यात आल्या आहेत. मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी दुष्काळी परिस्थितीचा आढावा आणि सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सर्व मंत्री उपस्थित होते. यापूर्वी राज्यात २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. मात्र, काही तालुक्यांमधून आलेल्या तक्रारींची दखल घेत 'ट्रिगर-१' आणि 'ट्रिगर-२' या दोन्ही निकषांचा पुन्हा आढावा घेण्यात आला. त्यानंतर आणखी ४० तालुक्यांचा समावेश करून एकूण ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळामुळे बाधित झालेल्या भागांतील शेतकऱ्यांना १२ सवलतींचा लाभ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. गेल्या २५ वर्षांच्या नोंदी पाहिल्यास राज्यात साधारणपणे नोव्हेंबरच्या अखेरीस दुष्काळ जाहीर केला जात



असे आणि त्यानंतर डिसेंबरमध्ये मदत दिली जात असे. यंदा मात्र परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दुष्काळ आधीच जाहीर करण्यात आला आणि त्यासंबंधीचा शासन निर्णय ऑक्टोबरमध्ये काढण्यात आला. बुधवारी पूरक शासन निर्णयही काढण्यात आला. मात्र, केंद्र सरकारकडून मदत मिळवण्यासाठी कायद्यानुसार ठरवलेले टप्पे आणि कालमर्यादा पूर्ण करावी लागते. त्यामुळे ही प्रक्रिया दिवाळीपूर्वी पूर्ण होणे कठीण आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांना तातडीने पाच हजार रुपये देण्याचा निर्णय घेतल्याचे फडणवीस यांनी सांगितले. दिवाळीपूर्वी ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा सरकारचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळग्रस्त भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढत असल्याने टँकरची संख्या वाढवण्यात येत आहे. मराठवाड्यातील बहुतांश भागांमध्ये निरीक्षण विहिरींमधील पाण्याची पातळी जमिनीपासून तीन मीटरपेक्षा खाली गेली आहे. अशा परिस्थितीत ऑक्टोबर-नोव्हेंबरपासूनच टँकर सुरू करावे लागतात. त्यामुळे आवश्यकतेनुसार टँकर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यांचे जीपीएसच्या मदतीने मागोवा घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. पिण्यासाठी पाणी राखून ठेवता यावे, यासाठी पाणीपुरवठा व्यवस्थेतून पाणी घेतल्या जाणाऱ्या सुमारे १६ हजार अवैध जोडण्या तोडण्यात आल्या आहेत. यापुढेही कोणी अवैधरीत्या पाणी उपसा केल्यास त्याची जोडणी तोडण्यात येईल. हा निर्णय कठोर वाटू शकतो; मात्र दुष्काळी परिस्थितीत नागरिकांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध ठेवणे आवश्यक असल्याने तो घेण्यात आल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. शैक्षणिक शुल्कमाफीसंदर्भात यापूर्वी काढलेल्या शासन निर्णयात १९९२ पासूनच्या काही अटींचा समावेश असल्याने सर्व पात्र लाभार्थ्यांना त्याचा फायदा मिळत नसल्याचे सरकारच्या निदर्शनास आले होते. मंत्रिमंडळाने या अटी काढून टाकण्याचा निर्णय घेतला असून, शुल्कमाफीचा निर्णय आता सरसकट लागू करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दुष्काळाच्या काळात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीसाठी तगादा लावू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. काही जण अतिउत्साहाने वसुलीचा प्रयत्न करतात; असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशाराही फडणवीस यांनी दिला. खासगी मायक्रो फायनान्स कंपन्यांशी चर्चा करून त्यांनीही कर्जवसुलीसाठी बळजबरीचे मार्ग वापरू नयेत, यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे.

संपादकीय

साडी नको, हप्ता वाढवा!

'सणासुदीच्या निमित्ताने अंत्योदय योजनेतील महिलांना मोफत देण्यात येणाऱ्या साड्यांचा दर्जा भिकार असतो. त्यामुळे त्या रेशनच्या दुकानात तशाच पडून राहतात. यात सरकारचा पैसा नाहक वाया जातो. म्हणून ही योजना बंद करून लाडकी बहीण योजनेतून मिळणारी रक्कम दीडवरून दोन हजार करण्यात यावी, अन्यथा आम्ही आंदोलन करू' अशा आशयाची निवेदने राज्यभरातून येऊ लागल्याने अन्नपुरवठा खात्यात खळबळ उडाली.

बऱ्याच विचारविनिमयानंतर ती महिला व बालकल्याणकडे पाठवून हा विभाग मोकळा झाला. ती मिळताच 'महिला'चे अधिकारी अस्वस्थ झाले.लाडक्या बहिणींचे लाड पुरवताना नाकात दम आलेला. त्यात दुष्काळ. त्यामुळे निवडणुकीत दिलेले अडीच हजारांचे आश्वासन पूर्ण करणे केवळ अशक्य. तशात या मागणीने उचल खाल्ली तर काय या प्रश्नाने सारे घामाघूम झाले. 'अन्न'च्या साडी खरेदीत खोट आहे. त्याचा भार आपण का सहन करायचा असा तार्किक प्रश्न एका अधिकाऱ्याने उपस्थित केला. यावरून दोन्ही विभागांत जोरदार 'पत्रापत्री' सुरू झाली. शेवटी वाद राज्यप्रमुखाकडे गेला. आधीच ते आंदोलनांमुळे कावलेले. त्यात नव्या आर्थिक भाराच्या मागणीने उचल खाल्ली तर आणखी अडचण. शेवटी त्यांनी सल्ला दिला. या निवेदनांवर विश्वास ठेवू नका. कदाचित यामागे विरोधकांची खेळी असू शकेल. त्यापेक्षा राज्यभर एक सर्वेक्षण हाती घ्या. महिला या साड्यांकडे का पाठ फिरवत आहेत, त्याचे उत्तर त्यातून शोधा. ऐकताच अधिकाऱ्यांचे डोळे चमकले. दोन्हीकडच्या अधिकाऱ्यांना 'निविदे'ची स्वप्ने पडू लागली. मग सर्वेक्षण कुणी करायचे? 'अन्न' की 'महिला'ने यावरून पत्ररूपी वाद रंगला. अखेर यातही राज्यप्रमुखाने हस्तक्षेप करून 'महिला'च्या पारड्यात वजन टाकले. त्यामुळे अख्खे अलिबाग आनंदले. मग तातडीचे काम म्हणून निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. ती पूर्ण होताच राज्यभर सर्वेक्षण सुरू झाले. १५ दिवसांत निष्कर्ष 'महिला'मधील अधिकाऱ्यांच्या हाती पडले. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे होता.'शासनाने लाडकी बहीण योजना सुरू केल्यापासून लाभार्थी महिलांच्या हाती बऱ्यापैकी पैसा खुळखुळू लागलाय. अडीअडचणीत त्या यातून नवऱ्यालासुद्धा मदत करतात. त्यामुळे त्यांचा पत्नीविषयीचा दृष्टिकोन बराच बदललेला. पत्नीला काय हवे काय नको याची काळजी ते घेऊ लागलेत. साडी हा स्त्रियांचा आवडता पेहराव. त्यामुळे पुरुषांकडून थोड्या महाग साड्यांची खरेदी सुरू झालेली. जिथे पती यासाठी पुढाकार घेत नाही तिथे पत्नी स्वत:च अशी खरेदी करते व हातात पैसे असल्याने चांगली साडी विकत घेते. अशा स्थितीत रेशनची विरविरीत साडी कोण घेणार? योजनेकडे पाठ फिरवण्याचे हे एक कारण. रेशनच्या साडीचे हातपुसणेसुद्धा धड टिकत नाही. गोधडी तयार करणे तर दूर असे बहुतेक लाभार्थींचे म्हणणे. 'आम्ही सरकारच्या बहिणी आहोत, इतक्या वाईट साड्या कशा नेसणार असा प्रश्न बहुतेक महिलांनी उपस्थित केला.' हे वाचून 'महिला'मधील अधिकाऱ्यांचे चेहरे उजळले. त्यांनी लगेच एक टिपण तयार केले. आधीच ते आंदोलनांमुळे कावलेले. त्यात नव्या आर्थिक भाराच्या मागणीने उचल खाल्ली तर आणखी अडचण. शेवटी त्यांनी सल्ला दिला. या निवेदनांवर विश्वास ठेवू नका. कदाचित यामागे विरोधकांची खेळी असू शकेल. त्यापेक्षा राज्यभर एक सर्वेक्षण हाती घ्या. महिला या साड्यांकडे का पाठ फिरवत आहेत, त्याचे उत्तर त्यातून शोधा. ऐकताच अधिकाऱ्यांचे डोळे चमकले. दोन्हीकडच्या अधिकाऱ्यांना 'निविदे'ची स्वप्ने पडू लागली. 'लाडकी बहिणीमुळे या मोफत साडी योजनेला काहीही किंमत उरली नसून ती तातडीने बंद करण्यात यावी व त्यासाठी खर्च होणारा निधी लाडकी बहीण योजनेकडे वळवावा.' हे टिपण राज्यप्रमुखाकडे गेल्याचे कळताच 'अन्न'चे अधिकारी हादरले. एका योजनेतील खरेदी हातोहात 'महिला'ने लांबवली म्हणून संताप व्यक्त केला. मग विभागाच्या मंत्र्यांनी जास्तीत जास्त महिला संघटनांनी 'लाडकी बहीण'चा हप्ता वाढवण्याची मागणी 'महिला'कडे करावी यासाठी राज्यभरातील कार्यकर्त्यांना कामाला लावले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

संजय गांधी उद्यानातील ८४८ एकर जमिनीचा प्रश्न मार्गी लागणार?

जन सम्राट टाईम्स



भडगाव|प्रतिनिधी: संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील ८४८ एकर जमिनीच्या हद्द निश्चितीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी संबंधित सोसायटीधारकांनी भूमी अभिलेख विभागाकडे तातडीने रीतसर अर्ज दाखल करावेत. हे अर्ज प्राप्त होताच संबंधित जागेची मोजणी व सर्वेक्षणाचे काम विलंब न लावता हाती घ्यावे, असे निर्देश गृह (शहरे) व महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले.या प्रक्रियेत स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन त्यांच्या सहकार्याने आवश्यक प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील या जमिनीच्या हद्द निश्चितीबाबत तसेच संबंधित प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी राज्यमंत्री योगेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील ८४८ एकर जमिनीच्या सीमांकनासंदर्भातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी सर्व संबंधित सोसायटीधारकांनी आवश्यक कागदपत्रांसह भूमी अभिलेख विभागाकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर विभागाने जागेची मोजणी आणि सर्वेक्षण तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश राज्यमंत्री कदम यांनी दिले. या प्रक्रियेत कोणताही विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचेही त्यांनी सूचित केले.हद्द निश्चितीची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे आणि स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन राबविण्यात येणार आहे. संबंधित नागरिकांचे सहकार्य घेऊन आवश्यक प्रशासकीय बाबींची पूर्तता करण्यात येईल, असे यावेळी राज्यमंत्री कदम यांनी स्पष्ट केले. बैठकीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, महसूल विभागाच्या सहसचिव मनीषा जायभाये, पोलीस उपायुक्त (उत्तर विभाग-३) गजानन राजमाने, उपवनसंरक्षक किरण पाटील, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी नागनाथ रोहिले नगरसेवक वैभव भरडकर, तसेच उज्वला भगत, आत्माराम चाचे, अरुण सुर्वे, सुरेश यादव, राजेश सावरकर, शरद वाघ, गोपाळ सुतार आणि संदीप मसूरकर यांच्यासह संबंधित प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील ८४८ एकर जमिनीच्या हद्द निश्चितीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी संबंधित सोसायटीधारकांनी भूमी अभिलेख विभागाकडे तातडीने रीतसर अर्ज दाखल करावेत. हे अर्ज प्राप्त होताच संबंधित जागेची मोजणी व सर्वेक्षणाचे काम विलंब न लावता हाती घ्यावेया प्रक्रियेत स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन त्यांच्या सहकार्याने आवश्यक प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील या जमिनीच्या हद्द निश्चितीबाबत तसेच संबंधित प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी राज्यमंत्री योगेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

गिरणा नदीवरील साठवण बंधाऱ्याचा मार्ग मोकळा!

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

जन सम्राट टाईम्स

पाळधी । प्रतिनिधी : गिरणा नदीवर मोठा साठवण बंधारा उभारून परिसरातील शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण हालचाली सुरू झाल्या आहेत. बांभोरी-निमखेडीदरम्यान मंजूर झालेल्या पूल-कम-बंधारा प्रकल्पात तांत्रिक अडचणींमुळे बंधाऱ्याचे काम रखडले होते. मात्र, पूल झाला तरी बंधारा झालाच पाहिजे, या भूमिकेवर ठाम राहत पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी मंत्रालयातील उच्चस्तरीय बैठकीत हा मुद्दा जोरकसपणे मांडला. त्यावर जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या घडामोडींमुळे गिरणा नदीवरील मोठ्या साठवण बंधाऱ्याच्या प्रस्तावाला नव्याने गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. २०२२ मध्ये ४० कोटींच्या प्रस्तावाला मान्यता जळगाव शहराजवळील बांभोरी-निमखेडीदरम्यान गिरणा नदीवरील विद्यमान पुलाला समांतर पूल-कम-बंधारा उभारण्याची संकल्पना पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी पुढे आणली होती. त्यांच्या



पाठपुराव्यानंतर सन २०२२ मध्ये या प्रकल्पासाठी सुमारे ४० कोटी रुपयांच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळाली होती.वाहतुकीची समस्या सोडविण्यासोबतच नदीतून वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा शेती आणि पाणीपुरवठ्यासाठी उपयोग करणे, हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश होता.

मात्र, तांत्रिक सर्वेक्षणादरम्यान बंधाऱ्याच्या उभारणीसंदर्भात अडचणी निर्माण झाल्याने पुलाचे काम पूर्णत्वाकडे गेले; परंतु बंधाऱ्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. त्यानंतरही पालकमंत्री पाटील यांनी हा विषय सातत्याने लावून धरला. संबंधित अधिकारी आणि लोकप्रतिनिधींशी चर्चा करून स्वतंत्र मोठा साठवण बंधारा उभारण्याचा पर्याय त्यांनी पुढे आणला. मंत्रालयातील बैठकीत त्यांनी तांत्रिक अडचणी दूर करून बंधाऱ्याचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली. त्याला जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने पुढील कार्यवाहीचा मार्ग सुकर होण्याची शक्यता आहे. शेतीला पाण्याचा आधार; भूजलपातळी वाढण्याची अपेक्षा प्रस्तावित साठवण बंधाऱ्यामुळे गिरणा नदीतील पाणी अडवून परिसरात जलसाठा निर्माण करण्यास मदत होऊ शकते. परिणामी, परिसरातील विहिरी आणि कूपनलिकांच्या भूजलपातळीत वाढ होण्याची अपेक्षा आहे. शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे,पाणीटंचाईच्या काळात आधार निर्माण करणे आणि जलसंधारणाला चालना देणे, या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरू शकतो. नदीपात्रात पाणीसाठा टिकून राहिल्यास नदीपात्राच्या संरक्षणालाही मदत होऊ शकते. अवैध वाळूउपशावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाच्या प्रभावी देखरेखीचीही आवश्यकता राहणार आहे. तापी खोऱ्यातील प्रलंबित प्रकल्पांचाही आढावा बैठकीत तापी खोरे जलनियोजन, तापी महाकाय पुनर्भरण योजना तसेच रावेर आणि यावल तालुक्यांसह जळगाव जिल्ह्यातील विविध प्रलंबित सिंचन प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. हे प्रकल्प जलदगतीने मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी दिल्या. बैठकीला मंत्री, आमदार आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला पणन मंत्री जयकुमार रावल, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार चंद्रकांत सोनवणे, आमदार अमोल जावळे, आमदार मंगेश चव्हाण आणि प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्यासह जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आता पुढील प्रशासकीय प्रक्रिया, तांत्रिक मान्यता आणि प्रत्यक्ष बांधकामाबाबतच्या निर्णयांकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

सातारा बँकेच्या निकालाने सांगलीत खळबळ; चार संचालकांच्या उमेदवारीवर टांगती तलवार?

जन सम्राट टाईम्स

धडगाव, जि. नंदुरबार | प्रतिनिधी : सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत दहा वर्षांचा संचालकपदाचा कालावधी पूर्ण झालेल्या संचालकांचे उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्याच्या निर्णयामुळे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीतही चर्चेला उधाण आले आहे.

कोल्हापूर सर्किट बेंचच्या निकालानंतर सांगलीतील चार संचालकांच्या उमेदवारीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. मात्र, साताऱ्यातील निकालाचा सांगलीतील उमेदवारीवर थेट परिणाम होणार का, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने सहकार क्षेत्राचे लक्ष कायदेशीर



घडामोडींकडे लागले आहे.सातारा जिल्हा बँकेच्या निवडणुकीत दहा वर्षांचा संचालकपदाचा कालावधी पूर्ण झालेल्या संचालकांच्या उमेदवारी अर्जांबाबत संजय मोरे यांनी न्यायालयात दाद मागितली होती. या प्रकरणात कोल्हापूर सर्किट बेंचने संबंधित संचालकांचे उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्याचा निर्णय दिला. या निकालानंतर अशाच प्रकारची परिस्थिती सांगली जिल्हा बँकेतही निर्माण होऊ शकते का, यावर चर्चा सुरू झाली आहे. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी ५ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी झाली होती. त्यानंतर ६ ऑक्टोबर रोजी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अधिकृत निर्णय जाहीर केला. या प्रक्रियेत दहा वर्षांचा संचालकपदाचा कालावधी पूर्ण झालेल्या काही संचालकांचे उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आले होते. या निर्णयाविरोधात संबंधितांकडून आक्षेप नोंदविण्यात आला नसल्याची तसेच न्यायालयात दाद मागण्यात आली नसल्याची माहिती आहे.

दिवाळीत केवळ 5 हजार देणे ही शेतकऱ्यांची थट्टा

हेक्टरी १ लाख रुपये अनुदान सरसकट दिले पाहिजे : हर्षवर्धन सपकाळ

जन सम्राट टाईम्स

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी : शेतकरी अस्मानी संकटाचा सामना करत आहेत. यावर्षी खरिप पुर्णपणे वाया गेला, पेरलेले हाती लागणार नाही, आता बघायचे कोणाकडे. मायबाप सरकार भरीव मदत करेल ही अपेक्षा शेतकरी बाळगून आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांना दिवाळीसाठी ५ हजार रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा प्रकार असून दुष्काळात होरपळत असलेल्या बळीराजाची थट्टा आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. छत्रपती संभाजी नगरमध्ये प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी जनआक्रोश दुष्काळ मोर्चा काढण्यात आला. महाराष्ट्रातील शेतकरी यावर्षी दुष्काळाच्या हालअपेष्टा सहन करत आहे.हे संकट खूप मोठे आहे पण शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्य जनतेच्या वेदनेचा आवाज सरकारच्या कानावर पडत नाही. शेतकऱ्यांसाठी काहीही करत नाही, या शब्दांत महाराष्ट्राचे प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद यांनी टीकास्त्र सोडले. शेतकऱ्यांना देण्यासाठी



सरकारकडे पैसे नाहीत. संकटात असलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याची ही वेळ आहे, राजकारण करण्याची नाही. शेतकऱ्याला हेक्टरी १ लाख रुपये अनुदान सरसकट दिले पाहिजे. कोणतेही सर्वे, पंचनामे, अभ्यास न करता मदत करा. सरसकट कर्जमाफी करा. शेतमजुरांना सानुग्रह अनुदान द्या, मनरेगाची कामे सुरू करा, शेतकऱ्यांच्या मुलांची सर्व शैक्षणिक फी माफ करा, एसटी पास मोफत द्या, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करा, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करा व सावकारांचा जाच थांबवा अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. दरम्यान, दुष्काळाची दाहकता प्रचंड आहे, खरिप हंगाम वाया गेला आहे, रब्बी हंगामातून हाती काही लागेल असे वाटत नाही. मराठवाड्यातील स्थिती तर अत्यंत वाईट आहे. शेतकऱ्यांबरोबर शेतमजूरही संकटात आहे. चारा-पाण्याची परिस्थिती कठीण आहे. पिण्याचे पाणी नाही. शेतकऱ्यांना तातडीने मदत झाली पाहिजे. जिराईत शेतीला हेक्टरी किती मदत देणार, बागायतीला किती मदत देणार हे सांगा, अशी विचारणा ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केली. शेतकरी अस्मानी संकटाचा सामना करत आहेत. यावर्षी खरिप पुर्णपणे वाया गेला, पेरलेले हाती लागणार नाही, आता बघायचे कोणाकडे. मायबाप सरकार भरीव मदत करेल ही अपेक्षा शेतकरी बाळगून आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांना दिवाळीसाठी ५ हजार रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा प्रकार असून दुष्काळात होरपळत असलेल्या बळीराजाची थट्टा आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. छत्रपती संभाजी नगरमध्ये प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी जनआक्रोश दुष्काळ मोर्चा काढण्यात आला. महाराष्ट्रातील शेतकरी यावर्षी दुष्काळाच्या हालअपेष्टा सहन करत आहे.हे संकट खूप मोठे आहे पण शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्य जनतेच्या वेदनेचा आवाज सरकारच्या कानावर पडत नाही.शेतकऱ्यांसाठी काहीही करत नाही, या शब्दांत महाराष्ट्राचे प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद यांनी टीकास्त्र सोडले.

शेतकऱ्यांचा संताप, तहसीलसमोर उधळल्या ५ हजारांच्या नोटा

जन सम्राट टाईम्स

हिंगोली| प्रतिनिधी : राज्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती असून ३०० हून अधिक तालुक्यात सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. सरकारने दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रीम मदत थेट बँक खात्यात जमा होणार असल्याचं जाहीर केलं आहे. मात्र, सरकारच्या या मदतीवरून हिंगोलीतील शेतकरी संघटनांसह विरोधकांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. तसेच, राज्यातील अनेक भागात शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला. विशेष म्हणजे, हिंगोली जिल्ह्यात शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयासमोर चक्क ५००० रुपयांच्या नोटांची उधळण केल्याचंही पाहायला मिळालं. पावसाअभावी कोरड्या दुष्काळाचे भीषण संकट निर्माण झाले असून, सोयाबीन, हळद आणि कपाशीची पिके करपून गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचीही टंचाई जाणवत असताना राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आलेली पाच हजार रुपयांची मदत अत्यंत तुटपुंजी असल्याचा आरोप करत क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गोरेगाव येथील अप्पर तहसील कार्यालयासमोर तीव्र निषेध आंदोलन केले. यावेळी भीक मागून जमा केलेले पाच हजार रुपये उधळून शासनाच्या मदत घोषणेचा निषेध करण्यात आला.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

अक्कलकुवा तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा महामोर्चा!

७/१२ उताऱ्यांवरील वनक्षेत्राच्या नोंदींना विरोध; प्रलंबित नोंदी मागे घेण्याचे तहसीलदारांचे आश्वासन

जन सम्राट टाईम्स

धडगावा प्रतिनिधी: अक्कलकुवा तालुक्यातील शेतजमिनींच्या सातबारा उताऱ्यांवर वनक्षेत्राच्या नोंदी करण्याच्या प्रशासकीय कारवाईविरोधात १३ ऑक्टोबर २०२६ रोजी हजारो शेतकरी आणि आदिवासी बांधवांनी अक्कलकुवा तहसील कार्यालयावर विशाल महामोर्चा काढला. वनक्षेत्राच्या नोंदींबाबत प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आले. यापूर्वी झालेल्या नोंदी मागे घेण्याबाबतही प्रशासनाने सकारात्मक भूमिका मांडल्याचे आंदोलकांनी सांगितले. कालिंका माता परिसरातून या महामोर्चाला सुरुवात झाली. घोषणाबाजी करत मोर्चेकरी तहसील कार्यालयावर धडकले. त्यानंतर तहसील कार्यालयाच्या आवारात ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले. युवा क्रांती संघटनेचे मुख्य समन्वयक विजयसिंग पाडवी यांनी मोर्चा आणि आंदोलनाचे सूत्रसंचालन केले. वारंवार निवेदने देऊनही दखल नसल्याचा आरोप शेतजमिनींच्या सातबारा उताऱ्यांवर एकतर्फी वनक्षेत्राच्या नोंदी घेतल्या जात असल्याचा आरोप करत या कारवाईला विरोध करण्यात आला. या प्रश्नावर जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना यापूर्वी वारंवार निवेदने देण्यात आली होती. मात्र, अपेक्षित कार्यवाही न झाल्याने महामोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. या आंदोलनाला आदिवासी सामाजिक कार्यकर्ते नागेश पाडवी, प्रताप वसावे, किरसिंग वसावे, सुधीर पाडवी, युवा क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष ॲड. रुपसिंग वसावे, प्रदेश प्रवक्ता ॲड. संग्राम पाडवी, जिल्हाध्यक्ष इंजि. संदीप वळवी,



डॉ. पंकज तडवी, जिल्हा निरीक्षक बाबुलाल पावरा, नितेश वसावे, अक्कलकुवा तालुकाध्यक्ष धिरसिंग वसावे, सोशल मीडिया तालुका प्रमुख इंजि. खुमानसिंग तडवी, मोरखीचे सरपंच इंजि. मिलनकुमार वळवी, डाबचे सरपंच इंजि. आकाश वळवी यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. तसेच अमरसिंग वसावे, धडगाव तालुकाध्यक्ष लक्ष्मण पाडवी, तळोदा तालुकाध्यक्ष प्रमोद वळवी, शहादा तालुकाध्यक्ष इंजि. मनोज वसावे, नवापूर तालुकाध्यक्ष अविनाश गावित, आकाश गावित, तालुका उपाध्यक्ष विशाल गावित, प्रतीक गावित, इंजि. सोहम पाडवी आणि लालसिंग तडवी यांनी सहभाग घेतला. आदिवासी वकील संघाच्या वतीने ॲड. सुभाष वळवी, ॲड. विरसिंग पाडवी, ॲड. रुपसिंग तडवी, ॲड. जितेंद्र वसावे, ॲड. फुलसिंग वळवी, ॲड. उमेश पाडवी आणि ॲड. प्रशांत वळवी यांच्यासह संघटनेचे कार्यकर्ते आणि तालुक्यातील हजारो शेतकरी या महामोर्चात सहभागी झाले होते. तहसीलदारांचे लेखी आश्वासन; पुढील आठवड्यात बैठक सायंकाळी पाच वाजल्यापासून उपविभागीय अधिकारी लघिमा तिवारी यांच्या उपस्थितीत शेतकरी आणि युवा क्रांती संघटनेच्या पदाधिकारी शिष्टमंडळासोबत तहसीलदारांच्या दालनात सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर तहसीलदार विनायक घुमरे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली.

आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, अक्कलकुवा तालुक्यात सातबारा उताऱ्यांवर वन विभागाच्या नव्याने होणाऱ्या नोंदी तात्पुरत्या स्वरूपात पूर्णपणे बंद करण्यात येतील. यापूर्वी ज्या सातबारा उताऱ्यांवर वन विभागाच्या नोंदी करण्यात आल्या आहेत, त्या नोंदीही मागे घेण्यात येतील, असे आश्वासन देण्यात आले. याशिवाय सर्व संबंधित शिष्टमंडळांना विश्वासात घेऊन पुढील आठवड्यात उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या प्रमुख उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात येईल, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले. या आश्वासनानंतर आंदोलकांनी आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित केले. शांततेत आंदोलन; पोलिसांचा बंदोबस्त महामोर्चा आणि ठिय्या आंदोलन शांततापूर्ण व संविधानिक मार्गाने पार पडले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी अक्कलकुवा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अर्जुन पटले यांच्या मार्गदर्शनाखाली कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस उपनिरीक्षक धिरसिंग वसावे यांच्यासह पोलीस कर्मचारी दिवसभर आंदोलनस्थळी सतर्क होते. सायंकाळी सात वाजेपर्यंत आंदोलक तहसील कार्यालयाच्या परिसरात ठिय्या देऊन होते. प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलनाची सांगता करण्यात आली. आश्वासनांच्या अंमलबजावणीकडे लक्ष प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असले, तरी सातबारा उताऱ्यांवरील वनक्षेत्राच्या नोंदींबाबत प्रत्यक्षात कोणती कार्यवाही होते, याकडे आता शेतकरी आणि आदिवासी बांधवांचे लक्ष लागले आहे. पुढील आठवड्यात होणाऱ्या बैठकीत या प्रश्नावर ठोस निर्णय होतो का आणि आश्वासनांची अंमलबजावणी कशी होते, यावर आंदोलनाच्या पुढील भूमिकेचे स्वरूप अवलंबून राहणार आहे.अक्कलकुवा तालुक्यातील शेतजमिनींच्या सातबारा उताऱ्यांवर वनक्षेत्राच्या नोंदी करण्याच्या प्रशासकीय कारवाईविरोधात १३ ऑक्टोबर २०२६ रोजी हजारो शेतकरी आणि आदिवासी बांधवांनी अक्कलकुवा तहसील कार्यालयावर विशाल महामोर्चा काढला. वनक्षेत्राच्या नोंदींबाबत प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

माळेगाव पिंप्री येथे ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा!

जन सम्राट टाईम्स



माळेगाव पिंप्री । प्रतिनिधी : माळेगाव पिंप्री येथे ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात, श्रद्धेने आणि सामूहिक सहभागातून साजरा करण्यात आला. यानिमित्त गावातील महिला व पुरुष मंडळाच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सकाळी गावातून धम्मध्वज मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण परिसरात 'जय भीम'च्या जयघोषाने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ माळेगाव पिंप्री येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्रिशरण-पंचशील ग्रहण; २२ प्रतिज्ञांचे पठण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर उपस्थित उपासक व उपासिकांनी सामूहिकरीत्या त्रिशरण-पंचशील ग्रहण केले. बौद्धाचार्यांच्या हस्ते धम्मदेशना देण्यात आली. यावेळी बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचे सामूहिक पठण करण्यात आले. या कार्यक्रमातून बौद्ध धम्मातील समता, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांचा संदेश देण्यात आला. महिला मंडळाच्या सहभागातून खीरदान धार्मिक कार्यक्रमानंतर गावातील सर्व बौद्ध बांधवांच्या वतीने खीरदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात महिला मंडळाने उत्स्फूर्त सहभाग घेत खीरदानाची व्यवस्था केली. सामाजिक एकोपा आणि बंधुभाव जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. 'जय भीम'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला कार्यक्रमादरम्यान 'बौद्ध धम्माचा विजय असो', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' आणि 'जय भीम' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला मंडळ, युवक मंडळ आणि भीम अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. माळेगाव पिंप्री येथील सर्व महिला व पुरुष मंडळाच्या वतीने ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सर्वांना मंगलमय शुभेच्छा देण्यात आल्या. माळेगाव पिंप्री येथे ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात, श्रद्धेने आणि सामूहिक सहभागातून साजरा करण्यात आला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सकाळी गावातून धम्मध्वज मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण परिसरात 'जय भीम'च्या जयघोषाने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ माळेगाव पिंप्री येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

परभणी जिल्ह्यात २१ ऑक्टोबरपासून विशेष आर्थिक समावेशन मोहीम!

प्रत्येक गावात बँकिंग शिबिरांचे आयोजन

जन सम्राट टाईम्स



परभणी । प्रतिनिधी केंद्र शासनाच्या अर्थ मंत्रालयाच्या निर्देशानुसार परभणी जिल्ह्यात २१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत विशेष आर्थिक समावेशन मोहीम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पात्र नागरिकाला बँकिंग सेवांशी जोडणे, शासकीय विमा व पेन्शन योजनांचा लाभ मिळवून देणे आणि डिजिटल बँकिंगबाबत सुरक्षिततेची जाणीव निर्माण करणे, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावात बँकिंग शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिली. जिल्हा प्रशासन, जिल्हा अग्रणी बँक कार्यालय आणि जिल्ह्यातील सर्व बँकांच्या समन्वयातून ही मोहीम राबविण्यात येणार आहे. बँकिंग सुविधांपासून वंचित नागरिकांना बँकिंग व्यवस्थेशी जोडणे, बँक खात्यांशी संबंधित प्रलंबित कामे पूर्ण करणे आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभ पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. विमा व पेन्शन योजनांच्या नोंदणीला प्राधान्य या मोहिमेदरम्यान प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजना यांमध्ये पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच संबंधित विमा योजनांच्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यांशी आधार क्रमांक जोडण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. यामुळे पात्र नागरिकांना विमा संरक्षण आणि सामाजिक सुरक्षेच्या योजनांचा लाभ मिळविणे सुलभ होणार आहे. प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत नवीन बँक खाती उघडणे, निष्क्रिय झालेली जनधन खाती पुन्हा कार्यरत करणे आणि विशेषतः असुरक्षित आदिवासी समूहातील कुटुंबांना बँकिंग सेवांशी जोडणे, यावरही लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. केवायसी आणि नामनिर्देशनाची कामे पूर्ण करा बँक खात्यांचे पुनःकेवायसी पूर्ण करणे, प्रलंबित खात्यांसाठी केंद्रीय केवायसी ओळख क्रमांक निर्माण करणे आणि बचत खाती, लॉकर तसेच इतर बँकिंग सुविधांमधील नामनिर्देशनाचे तपशील अद्ययावत करणे, यासाठी शिबिरांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या माध्यमातून बँक खात्यांशी संबंधित प्रलंबित कामे पूर्ण करण्यास नागरिकांना मदत होईल.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ हजारांची मदत!

राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३०५ वर

जन सम्राट टाईम्स



मुंबई । (प्रतिनिधी): राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आणखी ४० तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश केल्याची घोषणा केली. त्यामुळे राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या २६५ वरून ३०५ झाली आहे. या तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी प्रत्येकी ५ हजार रुपयांची प्राथमिक आर्थिक मदत थेट बँक खात्यात जमा करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. केंद्र सरकारकडून दुष्काळ मदतीची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी वेळ लागण्याची शक्यता असल्याने राज्य सरकार स्वतःच्या निधीतून आगाऊ मदत देणार असल्याचे सांगण्यात आले. दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना सणासुदीच्या काळात तातडीचा आर्थिक आधार मिळावा, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले. दुष्काळग्रस्त तालुक्यांना १२ प्रकारच्या सवलती राज्यातील ३०५ दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये शासनाच्या निकषांनुसार १२ प्रकारच्या सवलती लागू करण्यात येणार आहेत. यामध्ये पीक कर्जाचे पुनर्गठन, जमीन महसुलात सवलत, वीजबिलासंबंधी सवलती आणि शैक्षणिक शुल्क माफी यांसारख्या उपाययोजनांचा समावेश आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक शुल्क माफीचा लाभ मिळावा, यासाठी यापूर्वीच्या अटींमध्येही बदल करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे वृत्त आहे. या सवलतींमुळे दुष्काळाचा आर्थिक भार कमी करण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. सक्तीच्या कर्जवसुलीला आळा घालण्याचे निर्देश दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांवर कर्जवसुलीसाठी दबाव आणू नये, अशा सूचना सहकारी बँका आणि पतसंस्थांना देण्यात आल्या आहेत. खासगी बँका व वित्तीय संस्थांकडूनही सक्तीची कर्जवसुली रोखण्यासाठी आवश्यक सूचना देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले. मदत कधी जमा होणार? शेतकऱ्यांचे लक्ष शासनाच्या कार्यवाहीकडे दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३०५ झाल्याने अनेक भागांतील शेतकऱ्यांना मदत योजनांचा लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.

रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा दिवाळी बोनस जाहीर; केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आनंदाची बातमी समोर आली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा उत्पादकता आधारित बोनस (PLB) देण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे देशभरातील सुमारे ११.४० लाख अराजपत्रित रेल्वे कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे. या बोनससाठी केंद्र सरकारने २,००९.६१ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयाची माहिती दिली. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या कामगिरीची दखल घेऊन हा बोनस मंजूर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. दरवर्षी दुर्गापूजा आणि दसऱ्याच्या सणापूर्वी रेल्वे कर्मचाऱ्यांना उत्पादकता आधारित बोनस दिला जातो. यंदाही ७८ दिवसांच्या बोनसला मंजुरी देण्यात आली आहे. ११.४० लाख कर्मचाऱ्यांना लाभ केंद्रीय मंत्रिमंडळाने एकूण ११,४०,७७० रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी ७८ दिवसांचा उत्पादकता आधारित बोनस मंजूर केला आहे. रेल्वेच्या कामकाजात योगदान देणाऱ्या अराजपत्रित कर्मचाऱ्यांना या निर्णयाचा



लाभ मिळणार आहे. बोनससाठी मंजूर करण्यात आलेल्या २,००९.६१ कोटी रुपयांमुळे पात्र कर्मचाऱ्यांना सणासुदीच्या काळात आर्थिक मदत मिळणार आहे. उत्पादकता आधारित बोनस म्हणजे काय? उत्पादकता आधारित बोनस हा रेल्वे कर्मचाऱ्यांच्या कामगिरीशी संबंधित लाभ आहे.

पात्र कर्मचाऱ्यांना निर्धारित नियमांनुसार हा बोनस दिला जातो. सणासुदीच्या काळात बोनस मिळाल्याने कर्मचाऱ्यांना घरखर्च, खरेदी आणि इतर आर्थिक गरजा भागविण्यास मदत होते. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा आहे. रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आनंदाची बातमी समोर आली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा उत्पादकता आधारित बोनस (PLB) देण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे देशभरातील सुमारे ११.४० लाख अराजपत्रित रेल्वे कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे. या बोनससाठी केंद्र सरकारने २,००९.६१ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयाची माहिती दिली. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या कामगिरीची दखल घेऊन हा बोनस मंजूर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. दरवर्षी दुर्गापूजा आणि दसऱ्याच्या सणापूर्वी रेल्वे कर्मचाऱ्यांना उत्पादकता आधारित बोनस दिला जातो. यंदाही ७८ दिवसांच्या बोनसला मंजुरी देण्यात आली आहे. ११.४० लाख कर्मचाऱ्यांना लाभ केंद्रीय मंत्रिमंडळाने एकूण ११,४०,७७० रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी ७८ दिवसांचा उत्पादकता आधारित बोनस मंजूर केला आहे. रेल्वेच्या कामकाजात योगदान देणाऱ्या अराजपत्रित कर्मचाऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. बोनससाठी मंजूर करण्यात आलेल्या २,००९.६१ कोटी रुपयांमुळे पात्र कर्मचाऱ्यांना सणासुदीच्या काळात आर्थिक मदत मिळणार आहे.

'पाच हजार रुपये देताय, आम्ही भिकारी आहोत का?'

तुपकरांचा मुख्यमंत्र्यांना सवाल; 'पाच हजारांत मुख्यमंत्र्यांनी दिवाळी साजरी करून दाखवावी'

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: 'शेतकऱ्यांना पाच हजार रुपये मदत देताय, आम्ही भिकारी आहोत का? मुख्यमंत्र्यांना पाच हजार रुपये पाठवतो, त्यांनी या रकमेत दिवाळी साजरी करून दाखवावी,' अशा शब्दांत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला. धुळे जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आले असताना त्यांनी शेतकऱ्यांच्या मदतीवरून सरकारला धारेवर धरले. शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी आणि सरसकट कर्जमाफी करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती, हातातून गेलेली पिके, वाढते आर्थिक संकट आणि शेतकरी आत्महत्यांच्या घटनांवरून तुपकर यांनी सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट असताना पाच हजार रुपयांची मदत जाहीर करणे म्हणजे त्यांच्या संकटाची थट्टा असल्याची टीका त्यांनी केली. व्हीआयपींच्या सुविधांसाठी पैसा, शेतकऱ्यांसाठी का नाही? सरकारच्या खर्चाच्या प्राधान्यक्रमावर प्रश्न उपस्थित करत तुपकर म्हणाले की, व्हीआयपी व्यक्तींसाठी वाहन खरेदी, शक्तिपीठ महामार्ग,



कुंभमेळा, आमदार-खासदारांचे वेतन आणि मंत्र्यांचे दौरे यांसाठी सरकारकडे निधी उपलब्ध होतो. प्रधान सचिव आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या वेतनासाठीही पैसा खर्च केला जातो. मग संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना पुरेशी आर्थिक मदत देण्यासाठी निधी का उपलब्ध होत नाही, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. मात्र, शेतीत नुकसान झाल्यानंतर त्याला पुन्हा उभे राहण्यासाठी पुरेशी मदत मिळणे आवश्यक आहे. केवळ तुटपुंजी मदत जाहीर करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत, अशी भूमिका तुपकर यांनी मांडली. सोयाबीन, कापूस, तूर, मूग उत्पादक संकटात महाराष्ट्रातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याचा दावा करत तुपकर यांनी शेतीच्या नुकसानीकडे लक्ष वेधले. सोयाबीन, कापूस, तूर आणि मूग या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम झाला आहे. शेतीतील उत्पादन घटल्याने आर्थिक व्यवहार सांभाळणे, कर्जाची परतफेड करणे आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे शेतकऱ्यांसाठी कठीण बनल्याचे त्यांनी सांगितले. दररोज समोर येणाऱ्या शेतकरी आत्महत्यांच्या घटनांबाबत चिंता व्यक्त करत त्यांनी सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित केली. संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक आधार मिळावा, यासाठी मदतीची रक्कम वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. हेक्टरी एक लाख रुपये मदत, सरसकट कर्जमाफीची मागणी दुष्काळ आणि पीक नुकसानीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी, तसेच सरसकट कर्जमाफी करावी, अशी मागणी रविकांत तुपकर यांनी शासनाकडे केली. पाच हजार रुपयांची घोषित मदत अपुरी असल्याचे सांगत त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष नुकसानीचा विचार करून आर्थिक मदत निश्चित करण्याची मागणी केली.

कारागृह कर्मचाऱ्यांच्या मुलांना शिपाई भरतीत तीन टक्के आरक्षण

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । **प्रतिनिधी:** पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांप्रमाणेच कारागृह व सुधारसेवा विभागातील गणवेशधारी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनाही कारागृह शिपाई भरतीमध्ये तीन टक्के आरक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

यासंदर्भातील शासन निर्णय गृह विभागाने बुधवारी जारी केला. कारागृह शिपाई भरतीमध्ये पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी लागू असलेल्या १० टक्के समांतर आरक्षणातून तीन टक्के आरक्षण कारागृह व सुधारसेवा विभागातील गट-क आणि गट-ड संवर्गातील सर्व गणवेशधारी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहे.

कारागृह शिपाई ते तुरुंग अधिकारी या पदांवरील गणवेशधारी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना पोलीस शिपाई भरतीमध्ये तीन टक्के आरक्षण देण्याची तरतूद यापूर्वीच करण्यात आली होती. तसेच, पोलीस शिपाई पदाच्या भरतीसाठी लागू असलेले सेवाप्रवेश नियम कारागृह शिपाई, गट-क या पदाच्या भरतीसाठीही लागू करण्यात आले आहेत. पोलीस विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मिळणारे लाभ कारागृह व सुधारसेवा विभागातील गणवेशधारी अधिकारी-कर्मचाऱ्यांनाही लागू करण्याबाबत विचार करण्यासाठी गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

सातपुड्यात रोजगारनिर्मितीची प्रतीक्षा; मजुरांचे गुजरातकडे स्थलांतर सुरू!

दसऱ्यापूर्वीच गावपाडे होऊ लागले ओस; दुष्काळी परिस्थितीचा ग्रामीण अर्थव्यवस्थेला फटका

जन सम्राट टाईम्स

धडगाव। प्रतिनिधी: दुर्गम डोंगररांगांमध्ये वसलेल्या अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यांतील आदिवासी गावपाड्यांमधून रोजगाराच्या शोधात गुजरातसह महाराष्ट्रातील विविध शहरांकडे मजुरांचे हंगामी स्थलांतर सुरू झाले आहे. दसऱ्यापूर्वी सुरू होणारा हा प्रवास दिवाळीपर्यंत वेग घेतो. स्थानिक पातळीवर वर्षभर पुरेल असा रोजगार उपलब्ध नसल्याने अनेक कुटुंबांना उदरनिर्वाहासाठी गाव, घर आणि शेती सोडून परराज्यात मजुरीसाठी जावे लागत आहे. दरवर्षी घडणाऱ्या या स्थलांतराच्या चक्रामुळे सातपुड्यातील स्थानिक रोजगारनिर्मितीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. गुजरातमधील उद्योग, बांधकाम आणि साखर कारखान्यांत मजुरी अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यांतील अनेक आदिवासी कुटुंबे रोजगारासाठी सुरत, अंकलेश्वर, भरूच, नवसारी, बारडोली, धारीखेडा आणि गोंदेवीसह गुजरातमधील विविध भागांत जातात. तेथे कापड उद्योग, बांधकाम व्यवसाय आणि साखर कारखान्यांमध्ये मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला जातो. महाराष्ट्रातील पंढरपूर, सोलापूर आणि बारामती या भागांतही अनेक मजूर ऊसतोडणीसाठी जातात.

स्थानिक पातळीवर रोजगाराच्या मर्यादित संधी, शेतीवर असलेले अवलंबित्व आणि उत्पन्नाची अनिश्चितता यांमुळे स्थलांतर हा अनेक कुटुंबांच्या जगण्याचा भाग बनला आहे. रोजगारासाठी बाहेर पडताना कुटुंबातील सदस्यांना घरापासून दूर राहावे लागते.

त्यामुळे आर्थिक गरज भागविण्यासाठी स्थलांतर करावे लागत असले, तरी त्याचे सामाजिक आणि कौटुंबिक परिणामही जाणवतात. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीच्या उत्पन्नावर प्रश्नचिन्ह यंदा महाराष्ट्रातील अनेक भागांत कमी पाऊस आणि दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण



झाल्याने शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उत्पन्नाबाबत अनिश्चितता वाढली आहे. खरीप पिकांचे नुकसान आणि शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळण्याची शाश्वती नसल्याने मजुरांसमोरील आर्थिक अडचणी अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. शेतीची कामे हंगामी स्वरूपाची असल्याने वर्षभर रोजगार मिळत नाही. अशा परिस्थितीत कुटुंबाचा खर्च भागविण्यासाठी मजुरांना पर्यायी कामाचा शोध घ्यावा लागतो. स्थानिक रोजगाराच्या मर्यादित संधी आणि शेतीतील अनिश्चितता यांचा एकत्रित परिणाम स्थलांतरावर होत असल्याचे चित्र दिसून येते. होळीपूर्वी गावाकडे परतण्याची परंपरा आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक जीवनात होळी या सणाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे रोजगारासाठी गुजरात किंवा महाराष्ट्रातील अन्य भागांत गेलेले अनेक मजूर होळीपूर्वी आपल्या गावाकडे परततात. सण, शेतीची कामे आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांचा विचार करून स्थलांतराचे हे चक्र दरवर्षी सुरू राहते. प्रशासनाकडून रोजगारनिर्मिती आणि स्थलांतर कमी करण्यासाठी विविध प्रयत्न केले जात असले, तरी स्थानिक पातळीवर वर्षभर रोजगार उपलब्ध होण्याची गरज कायम आहे. केवळ योजनांची आखणी न करता त्यांची प्रभावी अंमलबजावणी, रोजगार हमीच्या कामांची उपलब्धता आणि गरजू कुटुंबांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविणे आवश्यक आहे. लघुउद्योग आणि वनाधारित व्यवसायांना चालना हवी अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यांमध्ये औद्योगिक वसाहतींचा अभाव, शेतीपूरक व्यवसायांच्या मर्यादित संधी आणि स्थानिक रोजगारनिर्मितीची अपुरी क्षमता ही प्रमुख आव्हाने आहेत. या भागातील भौगोलिक परिस्थिती आणि उपलब्ध संसाधनांचा विचार करून लघुउद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग, वनाधारित उत्पादनांवर आधारित व्यवसाय आणि स्वयंरोजगाराच्या संधी विकसित करण्याची गरज आहे. स्थानिक तरुणांना रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण देणे, बचत गटांना व्यवसायासाठी प्रोत्साहन देणे आणि स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे यांसारख्या उपायांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि स्थानिक संस्थांनी समन्वयाने दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे. सातपुड्यातील विकास केवळ रस्ते, पाणी, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधांपुरता मर्यादित न राहता स्थानिक कुटुंबांना आर्थिक स्थैर्य देणारा असणे गरजेचे आहे. रोजगारासाठी दरवर्षी होणारे स्थलांतर कमी करायचे असेल, तर तात्पुरत्या उपायांपेक्षा गावपातळीवर कायमस्वरूपी रोजगारनिर्मितीला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. दुर्गम भागातील रस्ते, पाणी, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधांबरोबरच स्थानिक रोजगारनिर्मिती हा विकासाचा महत्त्वाचा घटक मानला पाहिजे. अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यांतील गावपाड्यांमध्ये उद्योग, कौशल्य विकास केंद्रे आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी ठोस पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

स्थलांतरावर होत असल्याचे चित्र

सामाजिक आणि कौटुंबिक परिणामही जाणवतात. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीच्या उत्पन्नावर प्रश्नचिन्ह यंदा महाराष्ट्रातील अनेक भागांत कमी पाऊस आणि दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उत्पन्नाबाबत अनिश्चितता वाढली आहे. खरीप पिकांचे नुकसान आणि शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळण्याची शाश्वती नसल्याने मजुरांसमोरील आर्थिक अडचणी अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. शेतीची कामे हंगामी स्वरूपाची असल्याने वर्षभर रोजगार मिळत नाही. अशा परिस्थितीत कुटुंबाचा खर्च भागविण्यासाठी मजुरांना पर्यायी कामाचा शोध घ्यावा लागतो. स्थानिक रोजगाराच्या मर्यादित संधी आणि शेतीतील अनिश्चितता यांचा एकत्रित परिणाम स्थलांतरावर होत असल्याचे चित्र दिसून येते. होळीपूर्वी गावाकडे परतण्याची परंपरा आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक जीवनात होळी या सणाला विशेष महत्त्व आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

सातपुडा विद्यालयातील नवदुर्गांनी गिरविले स्वसंरक्षणाचे धडे!



जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी : बदलत्या सामाजिक परिस्थितीत मुलींनी सक्षम, स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनण्यासोबतच कोणत्याही संकटाचा धैर्याने सामना करण्यासाठी सज्ज असणे आवश्यक आहे. याच उद्देशाने नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर धुळे येथील सातपुडा शिक्षण संस्थेच्या विविध शाखांतील सुमारे ५०० विद्यार्थिनींना लाठी-काठी चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. भारतीय जनता पक्षाच्या बेटी बचाओ-बेटी पढाओ अभियानाच्या महाराष्ट्र प्रदेश प्रभारी अल्पा अनुप अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (ता. १३) हा उपक्रम राबविण्यात आला. नगावबारी परिसरातील सातपुडा शिक्षण संस्थेच्या प्रांगणात बेटी बचाओ-बेटी पढाओ अभियान, धुळे महानगरपालिका आणि किरणकुमार बहुद्देशीय शैक्षणिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींमध्ये आत्मसंरक्षणाची जाणीव निर्माण करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि प्रतिकूल परिस्थितीत स्वतःचे संरक्षण करण्यासाठी त्यांना सक्षम बनविणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. ५०० विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग सातपुडा माध्यमिक विद्यालय तसेच आश्रमशाळेतील सुमारे ५०० विद्यार्थिनींनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला. तज्ज्ञ प्रशिक्षक अशोक जाधव, ऋतुजा जाधव आणि नारायणी जाधव यांनी विद्यार्थिनींना लाठी-काठी चालविण्याचे प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणादरम्यान विविध तंत्रे, त्यातील बारकावे आणि स्वसंरक्षणासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांची माहिती देण्यात आली. नवरात्रोत्सवातील नवदुर्गांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाने विद्यार्थिनींमध्ये धैर्य, शिस्त आणि आत्मनिर्भरतेची भावना रुजविण्याचा प्रयत्न केला. संकटाच्या वेळी घाबरून न जाता प्रसंगावधान राखणे आणि स्वतःच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे, याचे महत्त्वही या प्रशिक्षणातून अधोरेखित करण्यात आले.आज महिला आणि युवती शिक्षण, उद्योग, प्रशासन, क्रीडा यांसह विविध क्षेत्रांत आपल्या कौशल्याच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. देशाच्या विकासात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. मात्र, कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रत्येक मुलगी सक्षम, स्वावलंबी आणि आत्मनिर्भर असणे आवश्यक आहे. मुलींमध्ये लहान वयापासूनच आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांना स्वतःचे संरक्षण करता यावे आणि त्यांच्या मनात धैर्य व शिस्तीची भावना रुजावी, या उद्देशाने नवरात्रोत्सवाच्या काळात लाठी-काठी प्रशिक्षणाचा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनी अधिक सक्षम नागरिक म्हणून घडण्यास मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नशिराबाद पुरतीच प्लास्टिकबंदी का? संपूर्ण जळगाव जिल्ह्यात कठोर अंमलबजावणी करा!

पंकज महाजन यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । प्रतिनिधी : जळगाव जिल्ह्यात प्लास्टिकबंदीच्या नियमांची समान आणि कठोर अंमलबजावणी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. नशिराबाद नगरपरिषदेने शहरात प्लास्टिकबंदीची अंमलबजावणी सुरू केली असताना, जिल्ह्यातील इतर भागांतही प्रतिबंधित प्लास्टिकचे उत्पादन, साठवणूक आणि विक्री रोखण्यात यावी, अशी मागणी नशिराबाद नगरपरिषदेचे प्रभारी नगराध्यक्ष पंकज शामकांत महाजन यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

प्रशासनाने महिनाभरात ठोस कारवाई न केल्यास तीन दिवसांचे लाक्षणिक उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. नशिराबादमध्ये १७ सप्टेंबरपासून कारवाई नशिराबाद नगरपरिषदेने १७ सप्टेंबर २०२६ पासून शहरात प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या आणि एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकविरोधात कारवाई सुरू केली आहे.

यासोबतच दवंडी आणि बैठकींच्या माध्यमातून नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये



जनजागृती करण्यात आली आहे. मात्र, तपासणीदरम्यान काही व्यापाऱ्यांनी या कारवाईबाबत नाराजी व्यक्त केली. नशिराबादमध्येच नियमांची अंमलबजावणी होत असताना जिल्ह्यातील इतर भागांत प्रतिबंधित प्लास्टिकचे उत्पादन आणि विक्री सुरू असल्यास स्थानिक व्यापाऱ्यांवरच कारवाई का, असा सवाल त्यांनी उपस्थित केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. एकसमान कारवाईची मागणी प्लास्टिकबंदीचे नियम केवळ एका शहरापुरते मर्यादित न राहता संपूर्ण जिल्ह्यात समान पद्धतीने राबविण्यात यावेत, अशी भूमिका पंकज महाजन यांनी मांडली आहे. जिल्ह्यात प्रतिबंधित प्लास्टिकचे उत्पादन, साठवणूक आणि विक्री सुरू असल्यास संबंधित यंत्रणांनी त्यावर नियंत्रण आणावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

यासाठी जिल्हाधिकारी यांनी महानगरपालिका आयुक्त, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांना आवश्यक त्या सक्त सूचना द्याव्यात. पुढील महिनाभरात प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात प्रभावी कारवाई करून त्याचे उत्पादन, साठवणूक आणि विक्री रोखावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास तीन दिवस उपोषण प्रशासनाने महिनाभरात ठोस पावले उचलली नाहीत, तर १७ ते १९ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर किंवा जळगाव येथील जी.एस. ग्राउंडवर तीन दिवसांचे लाक्षणिक उपोषण करण्यात येईल.

नशिराबादमध्ये मुलींसाठी मोफत कराटे प्रशिक्षण; २०० विद्यार्थिनींचा प्रतिसाद!

ड्रीम स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे नवरात्रोत्सवानिमित्त तीन दिवसीय शिबिर

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । (प्रतिनिधी): मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उद्देशाने नशिराबाद येथील लेवा हॉल, खालची आळी येथे ड्रीम स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त तीन दिवसीय मोफत कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला विद्यार्थिनी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे १५० ते २०० विद्यार्थिनींनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. स्वसंरक्षणाचे धडे, आत्मविश्वास वाढविण्यावर भर आजच्या काळात मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण मिळणे महत्त्वाचे बनले आहे. ही गरज लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात विद्यार्थिनींना कराटेच्या माध्यमातून स्वसंरक्षणाची प्राथमिक तंत्रे शिकविण्यात आली. संकटाच्या प्रसंगी सावध राहणे, प्रसंगावधान राखणे आणि आत्मविश्वासाने परिस्थितीचा सामना करणे, याबाबत प्रशिक्षणाचे



महत्त्व अधोरेखित करण्यात आले. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या उपक्रमातून मुलींच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शिबिरातील विद्यार्थिनींचा सहभाग आणि पालकांचा प्रतिसाद यामुळे आयोजकांचा उत्साह वाढला. उमेश महाजन यांचा पुढाकार; प्रशिक्षकांचे सहकार्य या शिबिराचे आयोजन उमेश महाजन सर यांनी केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी खुशवंत पाठक सर आणि करिश्मा अहिरे मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणाऱ्या या उपक्रमाचे पालकांनी कौतुक केले. कायमस्वरूपी कराटे वर्ग सुरू करण्याची मागणी तीन दिवसांच्या शिबिराला मिळालेला प्रतिसाद पाहता नशिराबादमध्ये मुलींसाठी नियमित आणि कायमस्वरूपी कराटे प्रशिक्षण वर्ग सुरू करावेत, अशी मागणी पालकांनी केली. मुलींना सातत्याने प्रशिक्षण मिळाल्यास त्यांचे कौशल्य विकसित होण्यास आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा पालकांनी व्यक्त केली. या मागणीला उमेश महाजन सर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत वर्ग सुरू करण्याबाबत आश्वासन दिले. मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण उपलब्ध करून देणे आणि त्यांना अधिक सक्षम बनविणे, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

धुळे जिल्हा रुग्णालयात जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा!

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: मानसिक आरोग्याचे महत्त्व, मानसिक आजारांविषयी जनजागृती आणि गरजूंना योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने धुळे जिल्हा रुग्णालयाच्या वतीने जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यानिमित्त रुग्णालयाच्या आवारात परिचारिकांनी पथनाट्य सादर करून नागरिकांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण केली. तसेच रांगोळी आणि पोस्टर स्पर्धांसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. मानसिक आरोग्य ही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाची बाब आहे. मानसिक तणाव, चिंता किंवा इतर मानसिक समस्यांकडे दुर्लक्ष न करता वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. हाच संदेश विविध जनजागृतीपर उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. सप्ताहभर विविध जनजागृतीपर कार्यक्रम जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित सप्ताहात जनजागृती रॅली, पथनाट्य, रांगोळी स्पर्धा आणि पोस्टर स्पर्धा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. शाळा-महाविद्यालयांसह सार्वजनिक ठिकाणी पथनाट्याच्या माध्यमातून मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. या उपक्रमांमध्ये परिचारिका आणि प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. रांगोळी व पोस्टर स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या परिचारिकांचा बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमांमुळे मानसिक आरोग्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यास मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. मानसिक समस्यांकडे दुर्लक्ष करू नका! मानसिक आरोग्य कसे जपावे, मानसिक आरोग्य बिघडल्याची लक्षणे दिसल्यास कोणत्या प्रकारचे उपचार घ्यावेत आणि योग्य मदत कुठे मिळू शकते, याबाबत वैद्यकीय तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. मानसिक त्रास जाणवत असल्यास समस्या लपवून न ठेवता डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. योग्य वेळी निदान आणि उपचार मिळाल्यास अनेक मानसिक समस्यांवर प्रभावीपणे मात करता येते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. सप्ताहभर चालणाऱ्या या कार्यक्रमांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. विक्रम वैद्य यांनी दिली. डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांचा सहभाग या कार्यक्रमाला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे, डॉ. स्वप्निल पाटील, डॉ. विवेक जाधव, डॉ. विक्रम वैद्य, डॉ. समीर शेख, डॉ. हरीश मेहरा, डॉ. हर्षद दाणे, ज्योती मोरे, परिचारिका प्रशिक्षणार्थींच्या प्राचार्य कविता नेतकर, बाह्यरुग्ण परिसेविका प्रतिभा घोडके, दीपली गिरमकर, जगदीश जिरे, नितीन गोंधळी, सागर घोडेस्वार आणि विलास लोंढे यांच्यासह डॉक्टर, परिचारिका व रुग्णालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फैजपूर नगरपरिषद दवाखान्याला राज्यस्तरीय विशेष कुष्ठरोग पथकाची भेट!

कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन; कुष्ठरुग्णाची प्रत्यक्ष भेट घेत उपचारांची माहिती जाणून घेतली

जन सम्राट टाईम्स

फैजपूर । प्रतिनिधी: नगरपरिषद दवाखान्याला १४ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्यस्तरीय विशेष कुष्ठरोग पथकाने भेट देऊन आरोग्य विभागाच्या कामकाजाची पाहणी केली. यावेळी पथकाने कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. तसेच एका कुष्ठरुग्णाची प्रत्यक्ष भेट घेऊन त्याला दिल्या जाणाऱ्या उपचारांची व आरोग्यविषयक परिस्थितीची माहिती जाणून घेतली. दवाखान्यातील कामकाजाबाबत पथकाने समाधान व्यक्त केले. या राज्यस्तरीय पथकामध्ये महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातील



कुष्ठरोग विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. सचिन एडके (पुणे) यांच्यासह जळगाव जिल्हा पर्यवेक्षक एन. एन. बढेव आणि एन. जे. चौधरी यांचा समावेश होता. भेटीदरम्यान पथकाने दवाखान्यातील कुष्ठरोगविषयक कामकाजाची सविस्तर माहिती घेतली. कुष्ठरुग्णांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवा, उपचारपद्धती तसेच संबंधित नोंदींची तपासणी करण्यात आली. यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन कामकाज अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी यावल तालुका कुष्ठरोग पर्यवेक्षक किशोर कराडे, रावेर तालुका यावल येथील एसटीएस नरेंद्र तायडे, आरोग्यसेवक चंदन पाटील आणि विवेक इंगळे उपस्थित होते. कुष्ठरोग नियंत्रणाच्या प्रयत्नांना बळ कुष्ठरोगाचे लवकर निदान, नियमित उपचार आणि रुग्णांना योग्य आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे, याला आरोग्य विभागाकडून प्राधान्य दिले जाते. पथकाच्या या भेटीमुळे स्थानिक पातळीवरील कामकाजाचा आढावा घेण्यासोबतच आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन मिळाले.

आरोग्य विभागाच्या कामकाजाची पाहणी

नगरपरिषद दवाखान्याला १४ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्यस्तरीय विशेष कुष्ठरोग पथकाने भेट देऊन आरोग्य विभागाच्या कामकाजाची पाहणी केली. यावेळी पथकाने कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. तसेच एका कुष्ठरुग्णाची प्रत्यक्ष भेट घेऊन त्याला दिल्या जाणाऱ्या उपचारांची व आरोग्यविषयक परिस्थितीची माहिती जाणून घेतली. दवाखान्यातील कामकाजाबाबत पथकाने समाधान व्यक्त केले. या राज्यस्तरीय पथकामध्ये महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातील कुष्ठरोग विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. सचिन एडके (पुणे) यांच्यासह जळगाव जिल्हा पर्यवेक्षक एन. एन. बढेव आणि एन. जे. चौधरी यांचा समावेश होता. भेटीदरम्यान पथकाने दवाखान्यातील कुष्ठरोगविषयक कामकाजाची सविस्तर माहिती घेतली. कुष्ठरुग्णांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवा, उपचारपद्धती तसेच संबंधित नोंदींची तपासणी करण्यात आली.

शिवाजी केशव चव्हाण यांचे अल्पशा आजाराने निधन

जन सम्राट टाईम्स



धरणगाव । प्रतिनिधी: शहरातील गुजराथी गल्ली येथील रहिवासी शिवाजी केशव चव्हाण यांचे बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने चव्हाण परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात शोक व्यक्त केला जात आहे. स्व. शिवाजी केशव चव्हाण यांची अंत्ययात्रा गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. धरणगाव येथील मार्केट कमिटी अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. केशव चव्हाण यांचे बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने चव्हाण परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात शोक व्यक्त केला जात आहे. शोकाकुल परिवार : भीमराव केशव चव्हाण, चंद्रकांत भीमराव चव्हाण, प्रसाद शिवाजी चव्हाण, भावेश शिवाजी चव्हाण, भूषण पाटील (जावई) व समस्त चव्हाण परिवार.